ARTHA ( Commercial Weekly ) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

*" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।*
*—कौटिलीय अर्थशास्त्र*

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 8484. Licence No 53.

वर्ष २६ पुणें, बुधवार तारीख २३ मार्च, १९६० अंक ११

## विविध माहिती

**गुजरात सरकारची सोय**—नव्या गुजरात सरकारचे अधिकारी व नौकरवर्ग ह्यांच्या राहण्याची सोय करण्यासाठी अहमदाबादमधील सहकारी संस्थांनीं सहकार्य करण्याची तयारी दाखविली आहे. शहरांतील १३० घरें सरकारला देण्याची तयारी ह्या संस्थांनीं दाखविली आहे. हीं घरें १८ सहकारी संस्थांनीं बांधलेलीं आहेत. ज्या संस्था अशा रीतीनें घरें ताब्यांत देतील त्यांना नवीन घरें बांधण्यासाठी सरकार मदत देईल.

**शेतकी विद्यापीठाला मदत**—उत्तर प्रदेशांत काढण्यांत येणाऱ्या शेतकी विद्यापीठाला अमेरिकेकडून डॉलर्स व रुपया ह्यांच्या चलनांत मिळून १०१ कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यांत आली आहे. भारतामधील अशा प्रकारचें हें पहिलेंच विद्यापीठ होईल आणि त्यांतील कार्यपद्धति अमेरिकेंतील शेतकी विद्यापीठासारखी राहील.

**म्हैसूर येथें मोटारसायकलींचा कारखाना**—म्हैसूर शहरांत मोटारसायकली तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचें ठरलें आहे, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. कारखान्यासंबंधींचा तपशील अद्याप ठरावयाचा आहे. कारखाना काढण्याच्या कामीं झेकोस्लोव्हाकिआचें तांत्रिक साह्य मिळणार आहे.

**जीवदया मंडळाची तक्रार**—सौराष्ट्रांतील गीरच्या जंगलांत भारतामधील सिंहांची वसाहत ठेवण्यांत आली आहे. सिंहांना त्यांच्या नैसर्गिक अवस्थेंत जंगलांत हिंडतां फिरतांना पाहण्यासाठी बरेच हौशी प्रवाशी जातात. प्रवाशांना सिंह करीत असलेली शिकार दाखविण्यासाठी जिवंत जनावरांचा आमिष म्हणून उपयोग करण्यांत येतो. ह्या प्रथेविरुद्ध सौराष्ट्रांतील जीवदया मंडळानें तक्रार केली आहे.

**खतांच्या कारखान्यासाठी कॉर्पोरेशन**—हिंदमधील खताचे चालू कारखाने व नव्यानें निघणारे कारखाने ह्यांचा कारभार चालविण्यासाठी एका कॉर्पोरेशनची स्थापना होण्याचा संभव आहे. ह्या उपक्रमांतील पहिलें पाऊल म्हणून सिंद्री व नांगल येथील खताच्या कारखान्यांसाठी एकच संचालक मंडळ नेमण्यांत आलें आहे.

**कोलंबोमधील ट्रॅम्स बंद**—कोलंबो म्युनिसिपल कौन्सिलनें शहरांतील ट्रॅम्स बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. ट्रॅमचे रूळ अतिशय झिजल्यामुळें ट्रॅम्स चालविणें धोक्याचें झाल्यामुळें वरील निर्णय घेण्यांत आला आहे. दोन वर्षांपूर्वीं वाहतुकीसाठी ट्रॉली बसेसचा वापर सुरू झाला. आतां फक्त दोनच मार्गांवर ट्रॅमची वाहतूक चालू आहे.

**विद्यापीठांत फिल्म क्लब्स**—विद्यापीठ अनुदान मंडळानें विद्यापीठांतील विद्यार्थ्यांसाठी फिल्म क्लब्स स्थापन करण्याची योजना आंखली आहे. ह्या क्लबमधून विद्यार्थ्यांना निरनिराळ्या प्रकारचे अनुबोधपट दाखविण्याची व्यवस्था करण्यांत येईल. योजनेच्या अंमलबजावणीसाठी मंडळानें ११,००,००० रुपये मंजूर केले आहेत. १३ विद्यापीठांतून असे क्लब्स स्थापन करण्यांत येणार आहेत.

**ब्रिटनची नवी प्रवासी बोट**—ब्रिटननें ' कॅनबेरा ' नांवाची एक नवीन प्रवासी बोट पी. अँड ओ. कंपनीकरतां बांधली आहे. तिचें वजन ४५,००० टन असून ती बांधण्यासाठी १॥ कोटी पौंड खर्च आला आहे. 'क्वीन मेरी' ह्या सुप्रसिद्ध बोटीच्या वजनाच्या निम्म्याइतकेंच वजन असलें तरी ह्या बोटींत २,२५० उतारूंची सोय होऊं शकेल.

**नंदलाल बोस ह्यांची कलाकृति**—सुप्रसिद्ध भारतीय चित्रकार श्री. नंदलाल बोस ह्यांच्या ' मायावतीचा रस्ता ' ह्या शीर्षकाचें एक तैलचित्र रशिआंतील लेनिनग्रॅडमधील कलासंग्रहालयाला भेट म्हणून देण्यांत आलें आहे. कलकत्ता येथील संग्रहालय सोडून जगांतील इतर कोणत्याहि कलासंग्रहालयांत बोस ह्यांच्या कलाकृति नाहींत.

**ब्रिटिश साप्ताहिकाचा अंत**—' टाइम अँड टाइड ' ह्या ब्रिटिश साप्ताहिकाचें प्रकाशन बंद करण्यांत येणार आहे. १९२० सालीं स्थापना करण्यांत आलेल्या ह्या नियतकालिकाला अलीकडे आर्थिक अडचणींना तोंड द्यावें लागत होतें. त्याचा खप ३०,००० पर्यंत आहे. ब्रिटिश सरकारचे मंत्री, पार्लमेंटचे सभासद, बिशप्स, इत्यादि श्रेष्ठ दर्जाच्या लोकांत त्याचा प्रस्ताव होता.

**शास्त्रीय पुस्तकांना उत्तेजन**—भारतामधील भाषांतून शास्त्रीय विषयावरील पुस्तकें प्रसिद्ध करण्यास उत्तेजन देण्यासाठी मध्यवर्ती सरकारच्या शास्त्रीय संशोधन खात्यानें १०,००० रुपयांचें वार्षिक बक्षीस जाहीर केलें आहे. जो प्रकाशक पांच उत्कृष्ट शास्त्रीय पुस्तकांची एक माला प्रसिद्ध करील त्यालाच बक्षीस मिळेल.

**चीनजवळ अणुबाँब आहे**—चीनजवळ अणुबाँब असून त्याचा प्रायोगिक स्फोट लवकरच करण्यांत येईल अशी माहिती लोकसभेच्या एका सभासदानें जाहीर केली होती. त्यावर कोणी फारसा विश्वास ठेवला नाहीं. पण लंडनमधील एका पत्रानें चीनजवळ अणुबाँब असून त्याचा स्फोट करणें रशियाच्या परवानगीवर अवलंबून आहे, अशी वार्ता प्रसिद्ध केली आहे.

### सहकारी साखर कारखान्यांच्या उत्पादकांना सूचना

मुंबई राज्यांतील साखर कारखान्यांच्या उत्पादकांनीं भावी सदस्यांकडून शेअर भांडवल जमविण्यापूर्वी, सहकारी खात्याकडून आपल्या योजना तपासून घ्याव्या व त्याकरितां मान्यता मिळवून घ्यावी, असें त्यांना एका प्रेस-नोटद्वारें कळविण्यांत येत आहे.

उसाचा सांठा, साखरेचें संभाव्य उत्पादन, योजनेची आर्थिक व्यवस्था व इतर बाबींचा शक्याशक्यतेचा पूर्ण विचार न करतां सहकारी साखर कारखान्यांचे उत्पादक शेअर भांडवल जमविण्यास सुरुवात करतात, असें आढळून आलें आहे. उत्पादकांनीं असें केलें व सहकारी खात्याकडून योजना नाकारण्यांत आली तर सदस्य व शेअर्स होल्डर्स यांना बराच त्रास होण्याचा संभव असतो. म्हणून, हा त्रास टाळण्याकरितां त्यांनीं उपयुक्त सूचना अंमलांत आणावी, असें कळविण्यांत येत आहे.

**कॅन्सरवरील नवें औषध**—कॅन्सरवरील नवें औषध तयार करण्याचा कारखाना मुंबईजवळ कुर्ला येथें काढण्यांत येणार आहे. हें औषध अमेरिकेंत व पश्चिम जर्मनींत बरेंच यशस्वी ठरलें आहे. पश्चिम जर्मनींतील एका औषधाच्या कंपनीच्या सहकार्यानें खाजगी मालकीचा हा औषधाचा कारखाना निघणार आहे.


**सेवानिवृत्त शास्त्रज्ञांचा उपयोग**—शेती व गुरांची जोपासना ह्याबाबतींत संशोधन करण्याची एक योजना इंडियन कौन्सिल फॉर ॲग्रिकल्चरल रिसर्च ह्या संस्थेनें आंखली आहे. प्रकृतीनें चांगल्या पण सेवानिवृत्त शास्त्रज्ञांना वरील विषयांबाबत संशोधन करण्यासाठीं संस्था मदत करणार आहे.

### पत्नीच्या नांवें केलेल्या विमापत्रावर ऋणकोचा अधिकार नाहीं

सन १८७४ च्या विवाहित महिला मालमत्ता कायद्यांत कांहीं दुरुस्त्या करून तो आतां पूर्वीच्या 'ब' विभागीय राज्यांत तसेंच मणिपूरलाहि लागू करण्यांत आला आहे. तद्नुसार १९५९ च्या विवाहित महिला मालमत्ता (विस्तार) कायद्याची अंमलबजावणी १ मार्च १९६० पासून सुरू झाली आहे. सन १८७४ च्या या कायद्यानुसार विवाहित पुरुषानें आपल्या पत्नीच्या व मुलांच्या लाभासाठीं घेतलेलें विमापत्र म्हणजे एक ट्रस्ट असून त्यावर ऋणकोचा अधिकार पोहोंचत नाहीं. त्याचप्रमाणें तें सदर व्यक्तीच्या मालमत्तेंतहि समाविष्ट करतां येत नाहीं. सन १९५३ च्या वारसा-कर-कायद्यानुसार विमापत्रावर मिळावयाची रक्कम इतर मालमत्तेंत जमा करतां येत नाहीं आणि वारसा कर आकारण्यासाठीं अशा विमापत्राची स्वतंत्र मालमत्ता म्हणून गणना करावी लागते.

**कुटुंबनियोजनाचीं आणखी केंद्रें**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत देशांत आणखी २,००० कुटुंबनियोजन केंद्रांची स्थापना करण्यांत येणार आहे. हीं नवीन केंद्रें स्थापन झाल्यावर कुटुंबनियोजनाविषयीं सल्ला देणाऱ्या केंद्रांची संख्या ४,८०० होईल. कुटुंबनियोजनाचा प्रचार करण्यासाठीं स्त्रियांच्या ऐच्छिक संघटनांची मदत घेण्यांत येणार आहे.

**पोलंडची भारताला मदत**—पोलंडच्या सरकारनें भारताला १५ कोटी रुपयांचें कर्ज देऊं केलें आहे. ह्या कर्जाचा उपयोग करून तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत भारताला संपूर्णपणें तयार कारखाने पोलंडपासून विकत घेतां येतील. कर्जाच्या अटी अजून ठरावयाच्या आहेत.

किर्लोस्कर
स्थापना १८८८
इलेक्ट्रिक पंपिंग सेट

भारतीय शेतकरी आपल्या शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठीं किर्लोस्कर पंपिंग सेटची निवड करतात. कारण ते अधिक काटकसरी, कार्यक्षम व खात्रीलायक आहेत. आपल्या कामीं योग्य आकाराच्या पंपाची निवड करून त्याचा भरपूर मोबदला मिळवा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी (द. सातारा)

# अर्थ

बुधवार, ता. २३ मार्च, १९६०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील साखरेचें उत्पादन

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अवधींत भारतांतील साखरेचें उत्पादन दरसाल ३० लाख टनांपर्यंत वाढविण्याचें उद्दिष्ट भारत सरकार व नियोजन-समिति ह्यांनीं ठरविल्याचें समजतें. देशांतील साखरेचा खप सारखा वाढत चाललेला आहे. १९५४–५५ सालीं साखरेचा खप १७·२ लाख टन झाला होता. तो १९५८–५९ सालीं २०·८ लाख टनांपर्यंत वाढला. त्या सालीं उत्पादन मात्र १९·२ लाख टनच झालें; परंतु मागील हंगामांतील शिल्लक असलेली साखर विक्रीस काढून गरज भागवितां आली. इतकेंच नव्हे तर कांहीं थोडी साखर निर्यातहि करतां आली. १९५९–६० सालच्या हंगामांत साखरेचें उत्पादन २ लाख टनांनीं वाढेल व एकूण उत्पादन २१ लाख टनांच्या आसपास जाईल असा अंदाज करण्यांत आला आहे. तथापि वाढलेले उत्पादन अंशतः तरी गेल्या दोन हंगामांतील घट भरून काढण्याच्या स्वरूपाचें राहणार आहे. कारण, त्या दोन हंगामांत साखरेचें उत्पादन सरासरी २० लाख टनांच्या जवळ-पासच झालें. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील साखरेच्या वार्षिक उत्पादनाचें लक्ष्य २२·५ लाख टन ठरविण्यांत आलेलें असल्यामुळें १९६०–६१ च्या हंगामांत १·५ लाख टन साखरेचें अधिक उत्पादन करावें लागेल. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत उत्पादनवाढीची हीच गति टिकवावी लागेल; तरच वार्षिक ३० लाख टन उत्पादनवाढीचें उद्दिष्ट गांठतां येणें शक्य होईल. ह्या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठीं नवे साखर कारखाने काढण्यास परवाने द्यावे लागतील. साखर कारखान्यांसाठीं लागणारी यंत्रसामुग्री मिळविण्याच्या बाबतींत अडचणी येण्याची फारशी शक्यता नाहीं.

साखर कारखान्यांची यंत्रसामुग्री बनविण्यासाठीं यंत्रें बनविणाऱ्या कारखान्यांच्या दोन संघटना स्थापन करण्यांत आल्या आहेत. साखरेच्या कारखान्याची बहुतेक यंत्रसामुग्री ह्या संघटना तयार करूं शकतात. रोज १,००० ते १,२५० टन ऊंस गाळणाऱ्या एका संपूर्ण साखर–कारखान्याची यंत्रसामुग्री बनविण्यास ८४ लाख रु. खर्च येतो. त्यांपैकीं २० लाख रुपयांची यंत्रसामग्री अद्यापहि परदेशांतून आणावी लागते. १९६१–६२ सालीं उत्पादन चालू करूं इच्छिणाऱ्या कारखान्यांसाठीं यंत्रसामुग्रींच्या मागण्या आतांच नोंदविण्यांत आल्या आहेत. साखरेचे नवीन कारखाने काढण्यासाठीं ह्यापुढें जे परवाने दिले जातील ते बहुशः ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांच्या सहकारी कारखान्यांनाच दिले जातील. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ५४ नव्या कारखान्यांना परवाने देण्यांत आले. त्यांपैकीं ३८ कारखाने सहकारी होते. त्यांतील २१ कारखान्यांनीं उत्पादनास प्रारंभहि केला आहे. चालू हंगामांत दोन कारखाने उत्पादनाची चांचणी घेणार आहेत. पुढील हंगामांत आणखी ८ कारखाने साखरेच्या उत्पादनास प्रारंभ करतील. उरलेले ७ कारखाने तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या आरंभीं अगर त्याच्या पहिल्या अर्धांत चालू होतील. सहकारी साखर–कारखान्यांच्या भांडवलापैकीं १५ ते २० लाख रु. भांडवल ऊंस उत्पादक शेतकऱ्यांनीं जमवावयाचें असतें. बाकीचें भांडवल इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन, व्यापारी बँका आणि राज्यसरकारें ह्यांनीं द्यावयाचें असतें. राज्यसरकारांना भांडवल उभारणीच्या ह्या कामांत भाग घेतां यावा म्हणून मध्यवर्ती सरकारकडून मदत मिळत असते. साखरेचें उत्पादन वाढविण्या-साठीं मध्यवर्ती सरकारकडून उसाच्या उत्पादकांना व कारखान्यांना सवलती देण्यांत येत आहेत.

## स्टेट बँक ऑफ इंडियाचा व्याप

स्टेट बँक ऑफ इंडियानें १९५९ मध्यें ९७ नव्या शाखा उघडल्या; नव्या शाखांना योग्य जागा मिळण्यातील अडचणी अजून कायमच आहेत. बँकेच्या चार सर्कल्समधील शाखा-वाढीचा तुलनात्मक तक्ता येथें दिला आहे:—

| सर्कल | योजनेंतील केंद्रांची संख्या | १-७-१९५९ पासून उघडलेल्या शाखा | १९५९ मध्यें उघडलेल्या शाखा | ३१-१२-१९५९ रोजीं बाकी |
|---|---|---|---|---|
| बंगाल | १४५ | १०७ | ३१ | ३८ |
| मुंबई | १४३ | ११२ | २७ | ३१ |
| मद्रास | ९९ | ८६ | २० | १३ |
| दिल्ली | ७६ | ५४ | १९ | २२ |
| एकूण | ४६३ | ३५९ | ९७ | १०४ |

१ जुलै, १९५९ नंतर पांच वर्षांत बँकेनें ४०० नव्या शाखा उघडायला हव्यात, त्यांपैकीं ३५९ उघडण्यांत आल्या आहेत. १९६० मध्यें उरलेल्या ४१ शाखा उघडल्या जाण्यास कांहींच हरकत नाहीं.

१९५९ अखेर बँकेच्या ८३१ कचेऱ्या होत्या. आठ स्टेट-असोसिएटेड बँकांच्या ३३५ कचेऱ्या लक्षांत घेतल्या (त्या सर्व स्टेट बँकेच्या सबसिडिअरीज होण्याच्या मार्गावर आहेत) म्हणजे स्टेट बँकेच्या व्यापारी कल्पना येते. ह्या आठ बँकांचा तपशील खालीं दिला आहे. एकट्या स्टेट बँकेकडे ५६३ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत आणि ह्या आठ बँकांकडे मिळून १०३ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत.

**पाणीपुरवठ्याचा कार्यक्रम**—बिहारमधील अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीनें पाणीपुरवठ्याची एक मोठी योजना बिहारच्या सरकारनें तयार केली आहे. योजनेसाठीं १८४ कोटी रुपये खर्च येणार असून येत्या १५ ते २० वर्षांतील पाणीपुरवठ्याच्या गरजा लक्षांत घेऊन ती आंखण्यांत आली आहे.

## करांचा निर्यातीवर होणारा परिणाम

इंडिअन कौन्सिल ऑफ फॉरिन ट्रेड ह्या संघटनेच्या तिमाही बैठकीपुढें श्री. आर. जी. सरय्या ह्यांचें भाषण झालें. श्री. सरय्या हे एक्सपोर्ट प्रमोशन संघटनेचे विभागीय सल्लागार असून त्यांच्या भाषणाचा विषय 'करांचा निर्यातीवर होणारा परिणाम' असा होता. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं, हिंदमध्यें जी करपद्धति अंमलांत आहे तिचा देशाच्या निर्यातीवर काय परिणाम होतो ह्याचा सखोल अभ्यास करण्यांत आला पाहिजे. अशा अभ्यासानें निर्यात व्यापारांत करामुळें कोणत्या अडचणी येतात तें समजण्यास चांगली मदत होईल. अर्थातच निर्यात व्यापार वाढविण्यास काय उपायांची जरूरी आहे ह्याचीहि सरकारला अधिक कल्पना येऊं शकेल. ह्यापुढें कम्युनिस्ट मतप्रणालीच्या देशांशीं अधिक प्रमाणांत व्यापारी संबंध प्रस्थापित करणें अगत्याचें आहे. ह्या देशांशीं व्यापार वाढविण्यास कांहींच हरकत वाटू नये. कम्युनिस्ट देशांकडून भांडवली स्वरूपाचा माल अधिकाधिक प्रमाणांत मिळविण्याचा प्रयत्न करण्यांत आला पाहिजे. अध्यक्ष श्री. मुरारजी वैद्य आधींच्या आपल्या भाषणांत म्हणाले कीं हिंदची परदेशीय व्यापाराची परिस्थिति सुधारत चालली आहे ही समाधानाची गोष्ट आहे. १९५७ व १९५८ सालाशीं तुलना करतां १९५९ सालांतील निर्यात व्यापारांत भारताला कमी प्रतिकूल तफावत सोसावी लागली. भारतामधील औद्योगिक उत्पादन आतां वाढत चाललें आहे. त्यामुळें देशाची आयात कमी करण्यांत व निर्यात वाढविण्यांत यश येण्याची चांगली शक्यता आहे. १९५८ च्या मानानें १९५९ सालीं निर्यातींत झालेल्या वाढीपेक्षा आयातींत झालेली वाढ थोडी अधिक आहे. पण औद्योगीकरणासाठीं द्यावी लागणारी ती किंमत आहे.

---

## परदेशीं जाणाऱ्या पार्सलांवर 'रजिस्टर्ड' शब्द नको

परदेशांत टपालानें पार्सलें पाठविणारे लोक त्यावर बऱ्याचदा रजिस्टर्ड असें लिहितात किंवा तशी चिठ्ठी डकवितात. परंतु यामुळें विशेषतः स्वतंत्र रजिस्टर्ड पार्सलची व्यवस्था असलेल्या देशांत गैरसमज होण्याचा संभव असल्यानें, परदेशी पाठवावयाच्या अशा पार्सलांवर तो शब्द लिहूं नये किंवा तशी चिठ्ठी डकवूं नये अशी विनंती जनतेस करण्यांत येत आहे. परदेशीं टपालानें रवाना होणारीं अशीं पार्सलें चालू नियमान्वयें टपाल व तारखात्याकडून 'रजिस्टर्ड' म्हणूनच समजण्यांत येतात पण त्याबद्दल जादा हंशील घेतलें जात नाहीं. तरीपण अशा पार्सलवर 'रजिस्टर्ड' हा शब्द लिहूं नये, असें टपाल व तार खात्याच्या डायरेक्टर-जनरलनें प्रसिद्ध केलेल्या एका पत्रकांत म्हटलें आहे.

---

## भारतांतील परकीय मिशनरी

एक जानेवारी १९५९ रोजीं भारतांतील परकीय मिशनऱ्यांची संख्या ४,८०२ होती. या वर्षांत २८२ परकीय मिशनऱ्यांना भारतांत येण्यासाठीं व्हिसा देण्यांत आले होते; परंतु त्यांपैकी प्रत्यक्षांत या देशांत किती आले त्याचा नक्की आकडा उपलब्ध नाहीं. जानेवारी १९५९ पासून या देशांतील परकीय ख्रिश्चन मिशन्सना ५०६·३ लाख रु. मिळाले असें उपलब्ध माहितीवरून दिसून येतें.

## श्री. सुपनेकर बंधूंच्या कल्पकतेचें कौतुक

### उद्योगमंत्रि ना. शहा यांची सदर्न मशीन इंडस्ट्रीजला भेट



उद्योगमंत्रि ना. मनुभाई शहा यांना श्री. वि. श्री. सुपनेकर कॅम मॅन्यु. प्रोसेसबद्दल माहिती सांगत आहेत.

"कल्पकता व नावीन्य या दोन गुणांनीं देशाची प्रगति जलद व उत्तम होते. पैशांत न मोजतां येणारी अशी ही राष्ट्राची सामग्री होय. सदर्न मशीन इंडस्ट्रीजचे चालकांत हे गुण भरपूर प्रमाणांत आढळतात. मी त्यांना सुयश चिंतितों." असें मत भारताचे उद्योगमंत्रि ना. श्री. मनुभाई शहा यांनीं पुणें येथील स्वारगेटाजवळील सदर्न मशीन इंडस्ट्रीजला भेट दिली ते वेळीं व्यक्त केलें. महाराष्ट्राचे कल्पक डिझाइनिंग इंजिनिअर्स सुपनेकर बंधु श्री. विनायकराव व श्री. अशोकराव आणि कुल्को इंजिनिअरिंग वर्कसचे संचालक श्री. कुलकर्णी यांनीं उद्योगमंत्र्यांचें स्वागत करून त्यांना सर्व कारखाना दाखविला. कारखान्यांत तयार होत असलेल्या कॅम्स व कीज, रबर, प्लॅस्टिक व कागद कारखान्यांना लागणारे कांहीं यंत्रभाग, स्क्रू, हैड्रॉलिक प्रेसेस, इत्यादि मालाचे नमुने उद्योगमंत्र्यांना दाखविण्यांत आले.

---

## परकीय प्रवाशांच्या सोयीसाठीं कुपनांची योजना

भारतांत येणाऱ्या परदेशीय प्रवाशांना यापुढें कॅमेरा फिल्म्स, तंबाकू किंवा मद्यपेयें यांची कमतरता पडेल अशी धास्ती बाळगण्याचें कारण नाहीं. भारत सरकारच्या प्रवासी खात्यानें चालू केलेल्या नव्या कुपनयोजनेखालीं कोणाहि परदेशीय प्रवाशांस माफक दरानें या वस्तु खरेदी करतां येतील.

मुंबई, दिल्ली, मद्रास व कलकत्ता या ठिकाणीं असलेल्या प्रवासी खात्याच्या कचेऱ्यांत त्यांना कुपनपुस्तिका मिळतील. त्यामुळें त्यांत १२५ रुपयांपर्यंत किंमतीच्या तंबाकू, मद्य किंवा फोटो फिल्म्स विकत घेतां येतील. विशेष म्हणजे मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास, आग्रा, बनारस, जयपूर, औरंगाबाद, भोपाळ, बंगलूर, म्हैसूर, कोचीन, पुरी, भुवनेश्वर, दार्जिलिंग व श्रीनगर या सोळा शहरांतील खास परवाना दिलेल्या दुकानांत त्यांस या वस्तूंची खरेदी करतां येईल. या दुकानांची यादी सदर कुपनपुस्तिकेच्या शेवटीं दिलेली आहे.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

### वार्षिक साधारण सभेच्या वेळीं अध्यक्ष श्री. वा. पु. वर्दे यांनीं केलेलें भाषण

योजनाबद्ध विकासाचें उद्दिष्ट आपले सरकारनें ठरविलें आहे व त्या दृष्टीनें त्याची अर्थविषयक व करविषयक धोरणें आंखलीं जात आहेत. त्याचा परिणाम देशांतील बँकिंगचे पद्धतीवर होणें अगदीं स्वाभाविक आहे. तुटीचें अर्थव्यवस्थेचें धोरण व त्याचा स्वाभाविक परिणाम म्हणून व्यवहारांतील चलनांत झालेली वाढ, परराष्ट्रांकडून मिळणारी आर्थिक मदत व सरकारी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांतील वाढता खर्च, तसेंच खेड्यांतून व लहान लहान शहरांतून नव्यानें उपलब्ध झालेल्या बँकिंगच्या सवलती व सर्वसाधारण जनतेमध्यें वाढलेली बँकिंगची प्रवृत्ति या सर्व गोष्टींचा संकलित परिणाम होऊन बँकांचे ठेवींत या वर्षी बरीच वाढ झाली. सर्व शिड्यूल्ड बँकांचे ठेवींत एकूण २६३ कोटींची वाढ होऊन त्या रुपये १५८२ कोटींवरून रुपये १८४५ कोटींवर गेल्या. पण या २६३ कोटींपैकीं रुपये १०४ कोटींची वाढ फक्त एकट्या स्टेट बँकेच्या ठेवींतच झाली. याचें मुख्य कारण म्हणजे अमेरिकेच्या पब्लिक लॉ ४८० प्रमाणें आपणांस मिळणाऱ्या मदतीमुळें येथें निर्माण होणारा पैसा हें होय. स्टेट बँक वगळतां इतर शिड्यूल्ड बँकांचे ठेवींत १२.९ टक्क्यांनीं वाढ झालेली दिसून येते. पण बँकांनीं उद्योगधंद्यांना दिलेल्या कर्जाचे रकमेंत मात्र त्या प्रमाणांत वाढ झाली नाहीं व म्हणून स्टेट बँकसुद्धां सर्व शेड्यूल्ड बँकांचें दिलेल्या कर्जाचे ठेवींशीं असणारें प्रमाण १९५८ मध्यें ५५ टक्के होतें, तें घटून १९५९ सालीं ५२.८ टक्क्यांवर आलें आहे. बँकांकडील ठेवींत याप्रमाणें वाढ झाली असली तरी त्यांत मुदतीच्या ठेवींचें, म्हणजे जास्त व्याजाचे दराच्या ठेवींचें प्रमाण बरेंच मोठें असल्यामुळें त्यांचा ठेवींवरील खर्चहि वाढला व नोकरवर्गावरील खर्च आधींच वाढलेला असल्यामुळें या वाढलेल्या खर्चामुळें बँकांचे नफ्यामध्यें घट झाली. परिणामीं १९५९ सालचे डिव्हिडंडमध्यें बऱ्याच बँकांनीं कपात केलेली दिसून येते.

बँकिंगच्या विकासाचे ह्या संदर्भात, आपल्या बँकेचे १९५९ मधील व्यवहार समाधानकारक झाले असल्याचें दिसून येईल. भागांवरील राहिलेली रक्कम मागविल्यामुळें आपलें वसूल भाग भांडवल रुपये २५,२२,००० वरून रुपये ३१,६८,००० वर गेलें आहे. आपली गंगाजळी रु. १,६०,००० नें वाढून ती रुपये १४,६०,००० इतकी झाली. या वर्षी बँकेनें, संचालकांचे अहवालांत निर्देश केल्याप्रमाणें, सात शाखा उघडल्या आहेत. महाराष्ट्राचे बहुतेक जिल्ह्यांत आतां आपल्या बँकेच्या शाखा आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे. बऱ्याच शाखांच्या ठिकाणीं स्थानिक सल्लागार समित्या नियुक्त केलेल्या आहेत, त्यांचेमुळें त्या त्या ठिकाणच्या ठेवीदारांशीं व उद्योगधंदेवाल्यांशीं निकटचे संबंध प्रस्थापित होतात व त्यांचा धंद्याचे वाढीस चांगला उपयोग होतो. आतांच सांगितलेंच आहे कीं स्टेट बँक वगळतां इतर शेड्यूल्ड बँकांचे ठेवींत या वर्षी १२.९ टक्क्यांनीं वाढ झाली आहे. आपल्या बँकेच्या बाबतींत मात्र ही वाढ २५.६ टक्के इतकी होऊन एकूण ठेवी रु. १३,२६,००,००० वर गेल्या ही विशेष समाधानाची गोष्ट आहे. ताळेबंदांतील इतर बाबींत झालेली वाढ ही बँकेचे एकूण व्यवहारांतच झालेल्या सर्वांगीण प्रगतीची निदर्शक आहे आणि म्हणून अधिक समाधानकारक आहे.

गेल्या वर्षी मी माझे भाषणांत नफ्यांत किंचित् घट सोसूनहि जिंदगीचे तरतेपणाचें प्रमाण अधिक ठेवण्यावर भर दिला होता. हेंच धोरण अहवालाचे वर्षीहि अवलंबिण्यांत आल्याचें आपणांस दिसून येईल. मात्र त्यांत परिस्थित्यनुरूप किंचित बदल झालेला आहे. ठेवींत झालेल्या रु. २,७०,००,००० वाढींपैकी रु. १,९७,००,००० इतकी रक्कम गुंतवणूक व रोकड या स्वरूपांतच ठेवली गेली आहे. इतर बँकांकडे असलेली शिल्लक व जवळील रोकड यांचें ठेवींशीं असलेलें प्रमाण १९५८ मध्यें १८.८३ होतें व तें अहवालाचे वर्षी १६.९३ इतकें खालीं आलें. पण त्याचबरोबर गुंतवणुकींत रु. १,७२,००,००० ची वाढ होऊन तिचें ठेवींशीं असलेलें प्रमाण ४५.५९ टक्क्यांवरून ४९.२४ टक्क्यांवर गेलें, व एकूण गुंतवणुकीची रक्कम रु. ६,५३,००,००० वर गेली. ठेवींतील वाढीचे मानानें पाहतां दिलेल्या कर्जाचे रकमेंत मात्र माफक प्रमाणांत वाढ झाली, व त्यांची रक्कम ४,२०,००,००० वरून ५,०७,००,००० वर जाऊन त्यांचें ठेवींशीं असलेलें प्रमाण ३९.८२ वरून ३८.२३ पर्यंत घटलें.

आपल्या बँकेचे ठेवींमध्यें १९५५ सालापासून साधारणपणें २५ टक्के वाढ होत असल्याचें मी गत वर्षीचे भाषणांत म्हटलें होतें. हाच रोख या वर्षीहि कायम राहिला असल्याचें दिसून येईल. पण ठेवींत याप्रमाणें वाढ होत असतां वाढत्या व्याजाचे रूपानें त्यावरील खर्चहि वाढला आहे. ठेवींवर दिलेल्या व्याजाचा संकलित दर १९५६ मध्यें १.६ टक्के होता तो १९५८ मध्यें २.१ टक्क्यांवर गेला. अहवालाचे वर्षी मात्र तो तेथेंच स्थिर झाला आहे. ठेवींवरील व्याजाच्या वाढत्या दराच्या एकंदर बँकिंग-पद्धतीवर होणाऱ्या प्रतिकूल परिणामामुळें कांहीं प्रमुख बँकांनीं पुढाकार घेऊन व एक बँकांतर्गत करार करून कॉलमनी डिपॉझिट म्हणजे अल्प मुदतीच्या ठेवींवरील व्याजाचे दर दि. १ ऑक्टोबर १९५८ पासून नियंत्रित केले होते ते १९५९ मध्यें आणखी कमी केले. पण केवळ एवढ्या एकमेव उपाय-योजनेमुळें बँकांचे नफ्याचे प्रमाणांत होणारी घट रोखून धरण्यांत यश येईल अशी खात्री देतां येत नाहीं.

आपल्या बँकेनें ठेवींवर दिलेल्या व्याजाचे रकमेंत या वर्षी रुपये ६,५१,००० ची वाढ झाली. जमेचे बाजूकडील व्याजाचे रकमेंत झालेली वाढ रु. १२,६३,००० इतकी आहे. या दोहोंतील फरक १९५८ मध्यें रु. १७,३४,००० होता तो १९५९ मध्यें रु. २३,३६,००० इतका झाला. नोकरवर्गाचे पगार व इतर बाबींवरील खर्चांत या वर्षी रु. ५,५०,००० इतकी वाढ होऊन त्याची रक्कम रु. २३,२७,००० इतकी झाली असल्याचें दिसून येईल. यांतील बराचसा खर्च नवीन शाखांमुळें व धंद्यांतील सर्वांगीण वाढीमुळें वाढलेल्या नोकरवर्गामुळें वाढलेला आहे हें नमूद करणें अवश्य आहे. या बाबींवरील खर्चांत इतकी मोठी वाढ होऊनहि या वर्षी नफ्याची रक्कम रु. २,१६,००० नीं वाढून ती रु. ७,७२,००० वर गेली आहे. या वाढीचें मुख्य कारण म्हणजे, आधीं म्हटल्याप्रमाणें बँकेचें सर्वच व्यवहारांत झालेली प्रगति व त्यामुळें वाढलेलें उत्पन्न हें होय. नफ्यांत वाढलेल्या रु. २,१६,००० पैकी रु. ९०,००० इन्कमटॅक्स खातीं खर्च झाला असल्याचें दिसून येईल. गंगाजळी भक्कम करण्याचे आपले वहिवाटीस अनुसरून गंगाजळींत रु. १,६०,००० वर्ग केले आहेत. आपली गंगाजळी वसूल भाग भांडवलाइतकी होईपर्यंत तरी नफ्याचा मोठा वांटा गंगाजळींत वर्ग केला जावा असें संचालकमंडळाचें धोरण आहे. या वर्षासाठी, पूर्वीचे ६॥

टक्के करमाफ डिव्हिडंड ऐवजी ९ टक्के करपात्र डिव्हिडंड देण्याची संचालक मंडळाची शिफारस आहे. पूर्वीप्रमाणें करमाफ डिव्हिडंड ऐवजी करपात्र डिव्हिडंड देण्याची शिफारस ही गेल्या वर्षी डिव्हिडंडचे संबंधांत इन्कमटॅक्सचे नियमांत झालेल्या बदलामुळें करावी लागत आहे. ही पद्धत अधिक व्यवहारी आहे असें वाटतें. कर वजा जातां भागीदारांस मिळणारी डिव्हिडंडची नक्त रक्कम विचारांत घेतल्यास तींत मागील वर्षीपेक्षां ०.२० नये पैसे इतकी घट झाल्याचें दिसून येईल. गेल्याच वर्षी आपल्या संचालक मंडळानें डिव्हिडंडचा दर अर्ध्या टक्क्यानें वाढवून ६॥ टक्क्यांवर नेला होता. या वर्षी त्यांत झालेली अल्प घट ही एकंदर बँकिंगच्या व्यवसायांत दिसून येणाऱ्या प्रवृत्तीचें द्योतक आहे. तसेंच नवीन करपद्धतीमुळेंहि ती अपरिहार्य झाली आहे.

पंचवीस वर्षांपूर्वी बँकेची स्थापना करतांना संस्थापकांनीं तिचें नांव बँक ऑफ महाराष्ट्र (महाराष्ट्राची बँक) असें ठेवलें. आतां बँकेच्या रौप्य-महोत्सवाचे वर्षी नवीन महाराष्ट्र राज्यहि अस्तित्वांत येत आहे हा योगायोग खरोखरच फार समाधानकारक आहे. जुन्या मुंबई राज्यांतील मराठी जिल्हे, जुन्या मध्य प्रदेशांतील विदर्भ प्रांत व पूर्वीच्या हैद्राबाद संस्थानांतील मराठवाडा विभाग हे एकत्र येऊन बनणारें हें नवीन राज्य, साधनसंपत्ति, बुद्धिमत्ता, धडाडी व उद्योगप्रियता यांत अग्रेसर राहील याबद्दल मला संदेह नाहीं. या नवीन राज्याची अर्थव्यवस्था भक्कम पायावर उभी करणें व तेथील प्रजेचें राहणीचें मान वाढविणें ही त्या राज्याच्या उत्कर्षाशीं ज्यांचे ज्यांचे संबंध निगडित झाले आहेत त्या सर्वांचीच जबाबदारी होय. प्राथमिक पाहणीमध्यें या राज्याचे सर्वांगीण विकासास भरपूर वाव असल्याचें प्रकट होत आहे. निरनिराळ्या विकास योजनांचे आराखडे मार्गस्थ होत आहेत. मला आशा आहे कीं राज्यसरकार, कारखानदार व कामगारवर्ग, तसेंच व्यापारी व सर्वसाधारण जनता हे सर्व, महाराष्ट्राबद्दलचे एकीचे व उत्कर्षाचे भावनेनें आणि उत्साहानें या विकास योजनांत सहभागी होतील व राज्याचा कारभार आर्थिकदृष्ट्या भरभक्कम होण्यास यथाशक्ति हातभार लावतील, आणि त्यामुळें सर्वांचा सर्वांगीण विकास होईल.

या नवीन राज्याचे घडणीमध्यें आपल्यापुढें प्रामुख्यानें येणारे दोन प्रश्न म्हणजे योजकता व भांडवलाचा पुरवठा हे होत. आजपर्यंत आपण शेतीचे उत्पादनाशीं संलग्न असलेल्या प्रश्नांपलीकडील इतर आर्थिक घडामोडींची उपेक्षा केली व केवळ तृतीय अगर चतुर्थ श्रेणीच्या नोकरींतच इतिकर्तव्यता मानत राहिलों. आज आपल्याकडे जे कांहीं उद्योगधंदे नांवारूपास आले आहेत त्यांच्यामागील प्रेरणा व त्यांचें धुरीणत्व ही संस्थांची नसून व्यक्तींची होती. अलीकडील काळांत ही प्रवृत्ति बदलत आहे ही गोष्ट स्वागतार्ह आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेमुळें उपलब्ध होणाऱ्या संधींचा योग्य उपयोग करून घ्यावयाचा असेल तर आपणांस उद्योगधंद्यांची उभारणी सामुदायिक अगर सहकारी तत्त्वावर म्हणजेच संस्थांच्या मार्फत केली पाहिजे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या या महाराष्ट्रांत जिला आपण भांडवलदारी म्हणून म्हणतों ती वर्ग या स्वरूपांत अस्तित्वांत नाहीं. त्यामुळें स्वाभाविकच उद्योगधंद्यांसाठी लागणारा पैसा हा सामान्य जनतेकडूनच संस्थांच्या माध्यमानें एकत्रित करून उपलब्ध करावा लागेल. आपल्या बँकेनें गेल्या पंचवीस वर्षांत लोकांकडील पैसे ठेवींच्या रूपानें गोळा करून एकत्रित करण्यांत यश मिळविलें आहे. महाराष्ट्र राज्याचे स्थापनेमुळें ज्या नवीन विकासाच्या संधि उपलब्ध होणार आहेत त्यामुळें निघणाऱ्या उद्योगधंद्यांना लागणाऱ्या वाढत्या आर्थिक साहाय्याची गरज आपली बँक पुरवूं शकेल असा मला विश्वास वाटतो.

गेल्या दोन वर्षांत बँकिंगच्या धंद्याबद्दलच्या दृष्टिकोनांत एक मूलग्राही बदल झालेला दिसून येतो, तो हा कीं बँकांची प्रवृत्ति दिवसेंदिवस व्यापार-उदीमाबरोबरच उद्योगधंद्यांनाहि भांडवल पुरविण्याकडे म्हणजे धंद्याच्या खेळत्या भांडवलासाठी अल्पमुदतीचीं कर्जे देण्याबरोबरच उद्योगधंद्यास लागणारीं दीर्घ मुदतीचीं कर्जेहि देण्याकडे अधिकाधिक झुकत असल्याचें दिसून येतें. आपली बँक या क्षेत्रांत पूर्वीपासूनच अग्रेसर आहे. या दृष्टीनें, लहान व मध्यम प्रतीच्या उद्योगधंद्यांस आवश्यक तें आर्थिक साहाय्य उपलब्ध करण्याच्या मोठ्या योजनेचा एक भाग म्हणून जी प्राथमिक व्यवस्था सुरू करण्याचें रिझर्व्ह बँकेनें ठरविलें आहे ती स्वागतार्ह आहे. या व्यवस्थेप्रमाणें अशा उद्योगधंद्यांना कर्जे देणाऱ्या बँकांस तोटा आल्यास त्याची आर्थिक जबाबदारी बँकांवर व पडतां रिझर्व्ह बँकेवर पडणार आहे. याप्रमाणें आपण कर्जाऊ दिलेल्या रकमांच्या सुरक्षिततेची हमी मिळविल्यावर आपल्या बँकेस लहान व मध्यम प्रतीच्या उद्योगधंद्यांस कर्जे देण्याच्या बाबतींत यापुढें अधिक धडाडीचें धोरण स्वीकारतां येईल. मला विश्वास आहे कीं, अशा लहान व मध्यम प्रतीच्या उद्योगधंद्यांतील लोक या संकलित योजनेचा फायदा घेतील व त्यायोगें महाराष्ट्राच्या औद्योगीकरणास हातभार लावतील.

आपल्या महाराष्ट्र राज्याची नव्यानें होणारी स्थापना हें आपल्या महाराष्ट्रीय जनतेच्या आकांक्षापूर्तीचें एक साधन होय. आपली बँक त्याच्या घडणीच्या बाबतींत आपलें कर्तव्य योग्य प्रकारें बजावील असें मी आपणांस आश्वासन देतों. त्यामुळें तिचाहि उत्कर्ष होईल. आपल्या बँकेस पुढील काळांत ज्या जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागणार आहेत, त्यांची संचालक मंडळास पूर्ण जाणीव आहे व ते या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आवश्यक इतकी बँकेची कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न करील. अर्थात् या सर्व कार्यांत संचालक मंडळानें आजपर्यंत बँकेचे वाढीसंबंधीं व प्रगतीसंबंधीं जें योग्य धोरण स्वीकारलें आहे त्याला महाराष्ट्रांतील चिकित्सक जनतेकडून आजच्याप्रमाणेंच पुढेंहि पाठिंबा मिळत राहील असा मला विश्वास आहे.

## स्टेट-असोसिएटेड बँका

(आकडे लक्ष रुपयांचे)

| | वसूल भांडवल | रिझर्व्हज | ठेवी | [illegible] |
|---|---|---|---|---|
| स्टेट बँक ऑफ हैद्राबाद | ५०.०० | २७.०० | १८,७८.६१ | ५३ |
| स्टेट बँक ऑफ जयपूर | ५०.०० | २५.५० | ९,१६,५८ | ४० |
| स्टेट बँक ऑफ इंदूर | १५.३१ | ३९.०० | ९,०४,३४ | १८ |
| स्टेट बँक ऑफ बिकानेर | ५०.०० | ३७.०० | १३,१६,३४ | ५४ |
| स्टेट बँक ऑफ त्रावणकोर | १,००.०० | २९.७२ | ६,९७.०८ | २० |
| बँक ऑफ पतियाळा | १५.०० | ५३.१४ | ६,५७.६२ | ४७ |
| स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र | १,००.०० | ६६.८९ | १६,५७.४२ | ६१ |
| बँक ऑफ म्हैसूर | ५०.०० | १,००.०० | १९,५६.५९ | ४३ |

### भारत सरकारची कर्जविषयक परिस्थिति

चालू वर्षअखेर, भारत सरकारला ४,६४३ कोटी रुपयांचें देणें असेल आणि १९६०–६१ अखेर त्याची रक्कम ५,२६३ कोटी रुपयांवर जाईल.

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | ३१–३–५९ | ३१–३–६० | ३१–३–६१ |
|---|---|---|---|
| भारतांत उभारलेलीं : | | | |
| चालू कर्जें | ४,३७·८७ | २,४४२·११ | २,५८०·६४ |
| ट्रेझरी बिलें | ४६·३० | १,२८३·३२ | १,४६०·३२ |
| स्पेशल फ्लोटिंग कर्जें | ... | २,७२·४३ | २,६९·०० |
| मुदत संपलेली कर्जें | ·६५ | १४·४२ | १८·८९ |
| एकूण | ४,८४·८२ | ४,०१२·२८ | ४,३२८·८५ |
| स्टार्लिंग कर्जें | | | |
| चालू कर्जें | ३,९६·५० | ७६·६३ | ८७·४१ |
| युद्धास साहाय्य | २०·६२ | २०·६२ | २०·६२ |
| रेल्वे ॲन्युइटी | ४७·८२ | ... | ... |
| ब्रिटिश बँका | ... | १३·३३ | १५·३३ |
| मुदत संपलेलीं कर्जें | ·०१ | ·१८ | ·१८ |
| एकूण | ४·६४·९५ | ११०·७६ | १२३·५४ |
| अमेरिकेचीं कर्जें | ... | २१४·५५ | ३४२·७४ |
| जागतिक बँकेचीं कर्जें | ... | १३३·२७ | १३७·७६ |
| एक्स. इं. बँकेचीं कर्जें | ... | ११·१५ | ४१·१५ |
| कॅनडाचीं कर्जें | ... | १५·७१ | १४·१७ |
| रशियाचीं कर्जें | ... | ५५·६७ | ६३·९१ |
| प. जर्मनीचीं कर्जें | ... | ८०·६४ | ७७·९९ |
| जपानचीं कर्जें | ... | ३·७५ | १७·७५ |
| नवीं उभारावयाचीं कर्जें | ... | ५·०० | ११५·०० |
| एकूण | | ५१९·७४ | ८१०·४७ |
| भारत सरकारचें एकूण कर्ज | ९,४९·७७ | ४,६४२·७८ | ५,२६२·८६ |

ह्यां कर्जाखेरीज, प्रॉव्हिडंट फंडांतील शिलका, पोस्टल बँक, वेगवेगळीं सर्टिफिकिटें, ठेवी, रेल्वे व टपाल खात्यांचे घसारा व रिझर्व्ह फंडस्, इन्कमटॅक्सच्या ठेवी, इत्यादि बाबतचें देणें असतें, तें वेगळेंच. १९५९–६० अखेर त्याची रक्कम १,२३३ कोटी रुपये व १९६०–६१ अखेर १,३४७ कोटी रुपये भरेल. म्हणजे, एकूण कर्जविषयक परिस्थिति खालीलप्रमाणें होते :—

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | ३१–३–१९५९ | ३१–३–१९६० |
|---|---|---|
| प्रत्यक्ष घेतलेलीं कर्जें | ४,६४२·७८ | ५,२६२·८६ |
| इतर देणीं | १,२३२·५१ | १,३४७·१६ |
| ब्रिटिश युद्धकर्ज | —२०·६२ | —२०·६२ |
| एकूण | ५,८५४·६७ | ६,५८९·४० |

ह्या कर्जाचा विनियोग कसा करण्यांत आला, त्यांतून जिंदगी कोणती निर्माण करण्यांत आली, तें खाली दिलें आहे :—

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | ३१–३–१९६० | ३१–३–१९६१ |
|---|---|---|
| रेल्वेज | १,४४२ | १,५६२ |
| पोस्ट व तार खातें इतर व्यापारी खातीं, ( दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन धरून ) | २०६ | २२८ |
| व्यापारी उपक्रमांत गुंतवणूक | ५२८ | ६२३ |
| कर्जें व उसन्या रकमा | २,१०६ | २,४८६ |
| ग्रेट ब्रिटनकडून येणें रकमा | २० | १९ |
| इंटरनॅशनल मोनेटरी फंडाची वर्गणी | २८६ | २८६ |
| इं. बँकेचे शेअर्स | ३८ | ३८ |
| पाकिस्तानाकडून येणें | ३०० | ३०० |
| रोख व इतर गुंतवणूक | ५६ | ५६ |
| एकूण | ४,९८२ | ५,५९८ |

उरलेले सुमारें ९९१ कोटी रुपये राज्यसरकारांना व इतर उपक्रमांना दिलेले आहेत, ते सर्वच कांहीं उत्पन्न न देणारें नाहींत,


# दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

आमच्या

## डेक्कन जिमखाना व टिळकरोड शाखेंत

सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची अद्यावत् व्यवस्था आहे.

सर्व प्रकारच्या आकारांचीं लॉकर्स मिळूं शकतील.

–इतरहि बँकिंगचे व्यवहार केले जातात.–

जे. डी. मोबेदूजी

चीफ एजंट

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : १४८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | व्याजाचा दर |
|---|---|
| १ वर्ष | २½ टक्के |
| २ वर्षें | २¾ टक्के |
| ३ वर्षें | ३ टक्के |
| ५ वर्षें | ३½ टक्के |
| १० वर्षें | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींच्या दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१-७-५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.

( स्थापना : १९११ )

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :

भागीदारांतर्फे रु. ४४ लक्ष
मुंबई सरकारतर्फें रु. ८१ लक्ष
रु. १ कोटी, २५ लक्ष

गंगाजळी व इतर फंड : रु. ५३ लक्ष
एकूण ठेवी : रु. १२ कोटी
खेळतें भांडवल : रु. २४ कोटींचे वर

१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.

## भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४४ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.
शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ९१,००० |

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबा नजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

(—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—)

श्री. म. त्र्यं. शिंगरे — अध्यक्ष
न. भू. ना. पां. थोपटे — उपाध्यक्ष
रावसाहेब य. द. खोले
श्री. चं. रा. राठी
श्री. गो. बा. देवी
श्री. बा. ग. धंदुके

स्थापना १९३६

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस :
पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई, गिरगांव, ३ मुंबई, दादर, ४. नासिक, ५. पुणें, ६. बार्शी, ७. लोणंद, ८. कोल्हापूर, ९. हलकर्णी, १०. इचलकरंजी, ११. फलटण.

| | | ३० जून, १९५९ अखेर |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४,७५,००० |
| ठेवी | रु. | १,६८,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,९५,००,००० |

मुदत ठेवींवरील व्याज :

| १ वर्ष ते २ वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें | दहा वर्षें |
|---|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·१५ | रु. ३·५० | रु. ४·०० |

रु. एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

दराबाबत चौकशी करावी.

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | २·५० |
| चालू डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | ०·५० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जन. मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एल्एल्. बी., चेअरमन


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.